महाराष्ट्र शासन
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग**
मुख्य कार्यालय : ५, ७, ८ वा मजला, कुपरेज टेलिफोन निगम इमारत, महर्षि कर्वे मार्ग, कुपरेज, मुंबई - ४०००२१ ☎२२७९५९००
फोर्ट कार्यालय : बँक ऑफ इंडिया इमारत, ३ रा मजला, फोर्ट, मुंबई-४००००१ ☎२२१०२२२२
Email ID : contact-secretary@mpsc.gov.in
Website : https://mpsc.gov.in , https://mpsconline.gov.in

**क्रमांक :** संकिर्ण/ऑ.प./उ.ता./२०२२/१६ **दिनांक :-** ३० जानेवारी, २०२३.

## -: प्रसिध्दीपत्रक :-

**विषय** : संगणकावर आधारित वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या चाळणी परीक्षांच्या उत्तरतालिकांबाबत.

आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या विविध वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या परीक्षांच्या उत्तरतालिका अंतिम करण्यासंदर्भात कार्यपद्धती आयोगाकडून विहित करण्यात आली आहे. सदरहू कार्यपद्धती आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या सर्व स्पर्धा, चाळणी, मर्यादित विभागीय वस्तुनिष्ठ स्वरूपाच्या परीक्षांसाठी लागू करण्यात आली आहे.

**२.** आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या चाळणी परीक्षा या संगणकावर आधारीत घेण्याचा निर्णय आयोगाने घेतला असून, त्यानुसार सर्व चाळणी परीक्षा संगणकावर आधारित ऑनलाईन स्वरूपात घेण्यात येत आहेत.

**३.** सरळसेवा भरतीअंतर्गत आयोगाकडे मोठ्या प्रमाणात मागणीपत्रे प्राप्त झाली असून, त्यांच्या निवड प्रक्रियेसाठी चाळणी परीक्षांची संख्याही मोठ्या प्रमाणात वाढली आहे. त्यामुळे आयोगामार्फत घेण्यात येणाऱ्या संगणकावर आधारित ऑनलाईन चाळणी परीक्षांच्या उत्तरतालिकांसंदर्भातील कार्यवाही पुढीलप्रमाणे करण्यात येईल.

३.१ आयोगामार्फत घेण्यात आलेल्या व यापुढे घेण्यात येणाऱ्या संगणकावर आधारित ऑनलाईन चाळणी परीक्षांच्या प्रथम उत्तरतालिका उमेदवारांच्या हरकतींसाठी प्रसिद्ध करण्यात येणार नाहीत.

३.२ संबंधित चाळणी परीक्षेच्या प्रश्नपत्रिकेतील प्रश्नांच्या योग्य उत्तरांचे पर्याय विचारात घेऊन एकच उत्तरतालिका तयार करण्यात येईल व ती अंतिम राहील.

३.३ सदर उत्तरतालिकेच्या आधारे संबंधीत चाळणी परीक्षेच्या निकालाची प्रक्रिया पार पाडण्यात येईल.

३.४ आयोगामार्फत संबंधित चाळणी परीक्षांचा निकाल आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध केल्यानंतर दुसऱ्या दिवशी संबंधीत परीक्षेची उत्तरतालिका उमेदवारांच्या माहितीसाठी आयोगाच्या संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल.

**४.** सदर प्रसिध्दीपत्रक निर्गमित केल्याच्या दिनांकापासून सदरची कार्यपध्दत अस्तित्वात येईल व ती प्रलंबित प्रकरणांसह सर्व प्रकरणी लागू राहील.

**सचिव,**
**महाराष्ट्र लोकसेवा आयोग,मुंबई.**